सायंदैनिक
# गुड इव्हिनिंग City
goodeveningcity@gmail.com

१६ जानेवारी २०२५, गुरूवार | वर्ष १३ वे | अंक २५१ | पृष्ठे ६ | किंमत ३ रू.




# केंद्राची ८ व्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी



**नवी दिल्ली, १६ जानेवारी (वृत्तसंस्था)** : केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला केंद्र सरकारने गुरुवारी मंजुरी दिली. या आयोगाच्या शिफारशी २०२६ पासून लागू केल्या जातील. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्वनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले- २०१६ मध्ये सातवा वेतन आयोग लागू झाला, त्याच्या शिफारशी २०२६ पर्यंत सुरू राहतील. केंद्र सरकारने श्री हरिकोटा येथे तिसऱ्या लॉन्च पॅडलाही मान्यता दिली आहे. सध्या सुविधेत २ लॉन्च पॅड आहेत. या दोन लॉन्च पॅडवरून आतापर्यंत ६० हून अधिक प्रक्षेपण करण्यात आले आहेत. तिसरे प्रक्षेपण पॅड तयार करून, उपग्रह आणि अंतराळ यान प्रक्षेपणांची संख्या वाढवता येईल. याद्वारे भारत आपल्या आवश्यक प्रक्षेपण मोहिमा पूर्ण करू शकेल आणि जागतिक मागणी देखील पूर्ण करू शकेल. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे न्यू जनरेशन लॉन्च व्हेईकल कार्यक्रम पुढे नेण्यात मदत होईल. हे लॉन्च पॅड ३९८५ कोटी रुपये खर्चून बांधले जाणार आहे. केंद्र सरकार दर १० वर्षांनी नवीन वेतन आयोग आणते. सध्या ७ वा वेतन आयोग सुरू आहे, त्याचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार आहे. २०२६ पासून ८ वा वेतन आयोग लागू होईल अशी अपेक्षा आहे.

८ व्या वेतन आयोगाचे वेतन मॅट्रिक्स १.९२ च्या फिटमेंट फॅक्टर वापरून तयार केले जाईल. हे असे समजून घ्या - केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे १८ स्तर आहेत. लेव्हल-१ कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १८,००० रुपये आहे आणि १८०० रुपये ग्रेड पे आहे. ८ व्या वेतन आयोगाअंतर्गत ते ३४,५६० रुपये केले जाऊ शकते. त्याचप्रमाणे, केंद्र सरकारमध्ये, कॅबिनेट सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना लेव्हल-१८ अंतर्गत कमाल मूळ वेतन २.५ लाख रुपये मिळते. हे अंदाजे ४.८ लाख रुपयांपर्यंत वाढू शकते.

# बुलढाण्यात आढळला अज्ञाताचा सापळा; घातपाताचा संशय



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहराच्या लगतच असलेल्या महाडा कॉलनी परिसरात आज सापळ आढल्याची घटना घडली आहे. बुलढाणा शहरातील म्हाडा कॉलनी जवळ असलेल्या जंगलातील दरीत एक सांगाडा आढळून आला आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे.

पोलीस सूत्राने दिलेल्या माहितीनुसार वनविभागाच्या वनमजुरांना हा सांगाडा आढळून आला. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पंचनामा केलेला आहे. हा सांगाडा पुरुषाचा की महिलेचा याबाबत अद्याप स्पष्ट माहिती नाही, मात्र मृतदेहाच्या आजूबाजूला असलेल्या कपड्यांवरून हा मृतदेह पुरुषाचा असावा असा अंदाज असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले मात्र यावर अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. या मात्र यावर अद्याप शिक्कामोर्तब झा-लेले नाही. या संदर्भात अधिक तपास सुरू असून काही सांगाड्याचे नमुने फॉरेन्सिक लॅब मध्ये तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.. आजूबाजूला घनदाट जंगल असल्याने हे हत्याकांड तर नाही ना असाही संशय आता निर्माण होऊ लागला आहे. यासंदर्भात बुलढाणा पोलिसांना खोलात जाऊन तपास करण्याची गरज निर्माण झालेली आहे. महाडा कॉलनीला लागून असलेल्या दरीत हा सापळा सापडल्याने एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणाचा पुढील तपास बुलढाणा शहर पोलिस करीत आहे.

# सैफ अली खानवर घरात घुसून हल्ला

**मुंबई, १६ जानेवारी (वृत्तसंस्था)** : बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर घरात घुसून चाकूने हल्ला करण्यात आला आहे. बुधवारी पहाटे दीडच्या सुमारास मुंबईतील खार येथील गुरू शरण अपार्टमेंटच्या १२व्या मजल्यावर ही घटना घडली. या हल्ल्यात अभिनेत्याच्या मानेवर, पाठीवर, हातावर आणि डोक्यावर ६ ठिकाणी वार करण्यात आले होते. रात्री २ वाजता सैफला लीलावती रुग्णालयात नेण्यात आले. लीलावती हॉस्पिटलचे सीओओ डॉ. नीरज उत्तमानी यांनी सांगितले की, सैफच्या पाठीच्या कण्यामध्ये चाकूचा तुकडा अडकला होता आणि फ्लूइडही गळत होते. तो तुकडा शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आला आहे. अभिनेत्याच्या डाव्या हाताला दोन खोल जखमा आणि मानेवर खोल जखमा होत्या. तिची प्लास्टिक सर्जरी झाली आहे. आता त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. मुंबई पोलिसांचे डीसीपी गेडाम दीक्षित यांनी सांगितले की, एका हल्लेखोराची ओळख पटली आहे. तो पायऱ्यांवरून अपार्टमेंटमध्ये शिरला होता. सैफ अली खानवर हल्ला करणारी व्यक्ती सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. इमारतीच्या सहाव्या मजल्यावर तो दिसला. हे सैफ अली खानचे अपार्टमेंट आहे. हल्लेखोराने पळून जाण्यासाठी पायऱ्यांचा वापर केला. पोलिसांनी जबरदस्तीने घरात घुसल्याचा आणि खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# २६ जानेवारीला खामगाव जिल्ह्याची निर्मिती होणार ?




**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे असून कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर अशा विभागात विभागणी केली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर एक यादी फिरत आहे.

त्यामध्ये बुलढाण्यातून खामगाव जिल्ह्याची निर्मिती होणार असल्याची माहिती दिसत असल्यामुळे चर्चांना उधाण आले आहे. २६ जानेवारी रोजी राज्य मंत्रीमंडळाकडून याची घोषणा होणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही दिवसांपूर्वी खामगाव ला एमएच ५६ आरटीओ क्रमांक मिळाल्यामुळे त्या स्वरूपाचे संकेत असल्याची चर्चा सुध्दा रंगत आहे.

तसंच, एक मजकूरदेखील फिरत आहे. महाराष्ट्रात पुन्हा २१ नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यात येणार असल्याचं यात नमूद करण्यात आलं आहे. या व्हायरल मेसेजमागचे सत्य नेमकं काय आहे? हे जाणून घेण्यामागचा प्रयत्न आम्ही केला आहे. जाणून घेऊया नक्की काय आहे हे प्रकरण? १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेव्हा राज्यात २६ जिल्हे होते. मात्र, वाढती लोकसंख्या आणि गरजा लक्षात घेता जिल्ह्यांचे विभाजन करण्यात आले आणि नवीन जिल्ह्यांची भर पडत गेली. तसंच, २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हा नवीन जिल्हा तयार करण्यात आला. त्यानंतर पुन्हा एकदा आणखी नवीन जिल्ह्यांचे निर्माण होणार अशी चर्चा सुरू होती. सध्या राज्यात शासनाकडून अनेक विविध योजना राबवण्यात येत आहेत. या योजनांसाठी शासन दरबारातून मोठ्या प्रमाणात निधी खर्च होतो. त्यामुळं आत्तातरी नवीन जिल्ह्यांच्या प्रस्तावावर कोण-ताही निर्णय घेण्यात आलेला नाही. नवीन जिल्ह्याची निर्मिती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. नवीन जिल्हाधिकारी कार्यालय असो किंवा जिल्हा न्यायालयाच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च येण्याची शक्यता आहे.










बातम्या तसेच जाहीरातीसाठी संपर्क | प्रकाशक : रणजीतसिंग राजपूत ९८५०३७७३४४ | संपादक : ॲड. हरीदास उंबरकर ९७६३४६९१८४ // गुड इव्हिनिंग सिटी सोशल मिडीयावर सुद्धा...

# सामाजिक संस्थांच्यावतीने महीला व बेरोजगारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी) :** येथे सामाजिक संस्थेच्या वतीने महाराष्ट्रभर अनेक उद्योग व्यवसाय चे जाळे असणाऱ्या शिवउद्योग संघटनेच्या माध्यमातून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, दिवसेंदिवस वाढणारे बेरोजगारी, महागाई यामुळे जनता त्रस्त होत आहे. त्यामुळे बेरोजगार तसेच महिलांना आर्थिक सक्षम करण्यसाठी व स्वतः चा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी दिनांक १९ जानेवारी २०२५ रविवार रोजी बुलडाणा येथे कै.रा.दे.भोंडे.सरकार उच्च प्राथमिक शाळा क्र.६ मध्ये सकाळी १० वाजता रोजगार मेळावा पार पडणार आहे या रोजगार मेळाव्यामध्ये महिलांना स्थानिक व तालुका स्तरावर अपेक्षित रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार असून, सामान्य माणसाच्या गरजेशी निगडीत अनेक सेवांची माहिती या वेळेस देण्यात येणार असून त्या त्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे, या रोजगार मेळाव्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे व या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आव्हान श्रावस्ती बहु.विकास प्रबोधिनी संस्था, श्रीमत शिक्षण व ग्रामीण विकास बहु.संस्था. राजश्री छत्रपती शाहू व बहु संस्था यांनी केले आहे

अधिक माहितीसाठी संपर्क :-८२०८४०७५०८ संदीप सुखधान, ९६०४४६९५६३ सतीश उबाळे,९१७५१२४११२ सचिन वायाळ ८६०५३५८९२० अजय जाधव यांच्याशी संपर्क साधावा.

महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

# जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा

| **संकेतस्थळ :** www.buldana.nic.in | **ईमेल :** laomiwbuldana@gmail.com |
|---|---|
| **शाखा :** उपजिल्हाधिकारी भूसंपादन (लघू सिंचन कामे,) जि.का.बुलढाणा | |
| **जा.क्र. :** भूसंपादन/लसिंका/म.स./कावि/१९/२०२५ | **दिनांक :** १४/०१/२०२५ |

## कलम १९ (१) खालील घोषणा

भूसंपादन प्रकरण क्रमांक- ०१/२०२२-२०२३ मौजे-बोंडगांव (बुडीत क्षेत्र) ता. शेगांव, जि. बुलढाणा या प्रकरणामध्ये ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलढाणा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ चा (३० यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मा. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे जा.क्र. कावि/म.स./उपजि. भूसं (लसिका)/९७/२०२३ दिनांक ०३-०८-२०२३ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे, आणि त्याव्दारे असे अधिसूचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनीर्दिष्ट केलल्या सार्वजनीक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे, किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, बुलढाणा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्याची खात्री पटली आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनीक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषीत केले जात असून पुनर्वसन पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनीर्दिष्ट केला आहे. आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्य पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन (लघु सिंचन कामे), जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-१ (जमिनीचे वर्णन)

**भूसंपादन प्रकरण क्रमांक- ०१/२०२२-२०२३**

**मौजे- बोंडगांव (बुडीत क्षेत्र) ता. शेगांव, जि. बुलढाणा**

| अ.क्र | गट क्रमांक | वहिती खालील क्षेत्र (हे.आर) | पोट खराब क्षेत्र (हे.आर) | एकुण संपादनाखालील क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|
| १ | १ | ०.६१ | ०.०० | ०.६१ |
| २ | २ | ०.६१ | ०.०० | ०.६१ |
| ३ | ३ | ०.६० | ०.०३ | ०.६३ |
| ४ | ४ | ०.९० | ०.०३ | ०.९३ |
| ५ | ४ | ०.८९ | ०.०४ | ०.९३ |
| ६ | ४ | १.७९ | ०.०८ | १.८७ |
| ७ | ५ | १.२७ | ०.०३ | १.३० |
| ८ | ५ | ०.९७ | ०.०३ | १.०० |
| ९ | ६ | १.०७ | ०.०२ | १.०९ |
| १० | ६ | १.०७ | ०.०२ | १.०९ |
| ११ | ७ | १.७० | ०.०० | १.७० |
| १२ | ७ | ०.८१ | ०.०० | ०.८१ |
| १३ | ७ | ०.८१ | ०.०० | ०.८१ |
| १४ | १६१ | ०.८० | ०.०१ | ०.८१ |
| १५ | १६१ | ०.६२ | ०.०१ | ०.६३ |
| १६ | १६१ | ०.६२ | ०.०१ | ०.६३ |
| १७ | १७२ | ०.६९ | ०.०० | ०.६९ |
| १८ | १७३ | २.०६ | ०.०० | २.०६ |
| १९ | १७४ | १.०२ | ०.०० | १.०२ |
| २० | १७४ | १.०३ | ०.०० | १.०३ |
| २१ | १७५ | १.०३ | ०.०० | १.०३ |
| २२ | १७५ | १.०२ | ०.०० | १.०२ |
| २३ | १७६ | ०.४० | ०.०० | ०.४० |
| २४ | १७६ | ०.६३ | ०.०० | ०.६३ |
| २५ | १७७ | ०.९८ | ०.०० | ०.९८ |
| २६ | १७८ | ०.६४ | ०.०२ | ०.६६ |
| २७ | १७९ | ०.२३ | ०.०१ | ०.२४ |
| २८ | १७९ | ०.४४ | ०.०० | ०.४४ |
| २९ | १७९ | १.१९ | ०.०२ | १.२१ |
| ३० | १८० | १.०९ | ०.०० | १.०९ |
| ३१ | १८१ | ०.३७ | ०.०० | ०.३७ |
| ३२ | १८२ | ०.८४ | ०.०० | ०.८४ |
| ३३ | १८३ | ०.८४ | ०.०० | ०.८४ |
| ३४ | १८४ | १.३८ | ०.०५ | १.४३ |
| ३५ | १८५ | १.१६ | ०.०५ | १.२१ |
| ३६ | १८५ | ०.२२ | ०.०१ | ०.२३ |
| ३७ | १८६ | ०.४१ | ०.०१ | ०.४२ |
| ३८ | १८७ | ०.५७ | ०.०१ | ०.५८ |
| ३९ | १८८ | ०.६५ | ०.०१ | ०.६६ |
| ४० | १८९ | ०.४० | ०.०० | ०.४० |
| ४१ | १८९ | १.४० | ०.०० | १.४० |
| ४२ | १८९ | ०.४० | ०.०० | ०.४० |
| ४३ | १८९ | १.०१ | ०.०० | १.०१ |
| ४४ | १८९ | ०.२० | ०.०० | ०.२० |
| ४५ | १९० | ०.८० | ०.०१ | ०.८१ |
| ४६ | १९१ | १.१० | ०.०२ | १.१२ |
| ४७ | १९२ | ०.०९ | ०.०१ | ०.१० |
| ४८ | १९२ | १.०० | ०.०१ | १.०१ |
| ४९ | १९३ | ०.३९ | ०.०० | ०.३९ |
| ५० | १९३ | ०.८१ | ०.०० | ०.८१ |
| ५१ | १९३ | ०.४० | ०.०० | ०.४० |
| ५२ | १९३ | ०.४१ | ०.०० | ०.४१ |
| ५३ | १९३ | ०.३५ | ०.०० | ०.३५ |
| एकूण क्षेत्र | | ४२.७९ | ०.५५ | ४३.३४ |

## अनुसूची-२

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरणपत्र

***प्रकल्पाचे नांव :*** - जिगांव मोठा सिंचन प्रकल्प ता. नांदुरा जिल्हा बुलढाणा अंतर्गत जिगांव प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राकरिता मोजे बोंडगांव येथील अनुसूची-१ मध्ये विनिर्दोष्ट जमीनीच्या संपादनाची आवश्यकता आहे.

***प्रकल्प कार्यालयाचे वर्णन :***- कार्यकारी अभियंता, जिगांव पुनर्वसन विभाग, खामगांव

***समाजाला मिळणारे लाभ:***- या प्रकल्पामुळे शेतीसाठी पाणी, सार्वजनिक पाणीपुरवठा, उदयोगधंद्याना पाणीपुरवठा होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्मिती होणार असून ग्रामीण भागातील कष्टकरी, शेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या जीवनमानात (STANDARD OF LIVING) सुधारणा होणार आहे.

## अनुसूची-३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन :- प्रस्तुत संपादन प्रक्रियेत जिगांव प्रकल्पाच्या सदयस्थितीतील टप्प्यात सदर बाधित व्यक्तींचे तूर्तास विस्थापन होत नसल्याने संबंधित यंत्रणेकडून पुनर्वसाहत क्षेत्र निश्चीत करण्यात आलेले नाही..

## अनुसूची-४

**(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)**

शासन पत्र क्रमांक-आरपीए-४०९/प्र.क्र. १३२/र-१, दि.२२/०७/२००९ अन्वये जिगांव पाटबंधारे मोठा प्रकल्प हा राज्य शासनाचा प्रकल्प असुन जलसंपदा विभागामार्फत उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाची प्रकल्प संस्था जलसंपदा विभाग असून या प्रकल्पामुळे बाधित होणा-या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ व केंद्र शासनाचे राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००७ नुसार होत असल्याने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनःस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ नुसार पुनर्वसन व पुनर्स्थापना योजना लागू होत नाही.

*टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन (लघू सिंचन कामे) जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.*

दिनांक : १४ /०१/२०२५

ठिकाण : बुलढाणा

उपजिल्हाधिकारी भुसंपादन (ल.सि.का.) सत्यमेव जयते बुलढाणा

(सुरेश धोरात)
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
(लघू सिंचन कामे), बुलढाणा

(डॉ.किरण पाटील, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी , बुलढाणा

जिमाका/बुल/जाहि/१७४/२०२५

16 JAN PAGE 3_Layout 1 1/16/2025 11:01 AM Page 1



# निरामय

गुड इव्हिनिंग City

## तिशीनंतर केसगळती, वापरा ही क्लृप्ती

**वयाच्या तिशीच्या जवळ जातो तसतसे केसांमध्ये पोषणाची कमतरता वाढू लागते. त्यामुळे केसांचा पोत खराब होणे. केस गळणे आणि कुरळे केस वाढणे या समस्या वाढतात. त्यामुळे केस कोरडे, निर्जीव होतात आणि त्याचे प्रमाण कमी होते. केसांची योग्य काळजी न घेणे हे त्याचे प्रमुख कारण आहे. कामामुळे, घर आणि मुलांची काळजी घेताना आपण अनेकदा स्वत: ची काळजी घेऊ शकत नाही. या सोप्या टिप्सद्वारे, तुम्ही ३० नंतरही निरोगी आणि मजबूत राहू शकता. साध्या साध्या गोष्टीचा वापर करून तुम्ही या गोष्टींवर मात मिळवू शकता. चला तर मग जाणून घेऊयात कोणत्या आहेत त्या गोष्टी...**

जर तुमचे केस तेलकट असतील तर तुम्ही ते आठवड्यातून एकापेक्षा जास्त वेळा धुवावेत. जर तुमची टाळू तेलकट असेल तर दिवसातून एकदा तरी केस धुवा. जर तुमची टाळू कमी तेलकट असेल तर तुम्हाला वारंवार शॅम्पू करण्याची गरज नाही. जर तुमच्या टाळूवर स्केल दिसत असतील तर असे होऊ शकते की तुम्ही नियमितपणे आणि व्यवस्थित शॅम्पू करत नाही.



### स्टाइलमुळे नुकसान

जर तुम्हाला केस गळतीची समस्या असेल तर केसांना गरम करण्याचे साधन वापरणे टाळा. त्यामुळे केसांची आर्द्रता कमी होऊ लागते. तसेच केस जळतात आणि कोरडे होतात आणि मोठ्या प्रमाणात तुटू लागतात. केसगळतीपासून तुमचे केस वाचवायचे असतील , तर हीटिंग टूल्स वापरण्याऐवजी नैसर्गिक टिप्स वापरून केस सरळ किंवा कुरळे करा. हीटिंग टूल्सशिवाय, केस सेट करण्यासाठी वापरण्यात येणारे हेअर फिक्सर देखील केस खराब करतात. अशा परिस्थितीत केसांची काळजी घेणे गरजेचे आहे.

## सावध व्हा नाहीतर टक्कल



**केस गळणे ही केवळ कॉस्मेटिक समस्या नाही तर ती तुमच्या मानसिक आरोग्यावरही खोलवर परिणाम करू शकते. यामागे आनुवंशिकता आणि वृद्धत्व हे कारण असू शकत असले तरी केस गळणे आणि टक्कल पडण्यामागे व्हिटॅमिनची कमतरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. कारण निरोगी केसांच्या वाढीसाठी अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे भूमिका बजावतात. त्यांच्या कमतरतेमुळे केसांची समस्या निर्माण होते. पण केस धुताना किंवा धुताना दररोज १०० केस गळणे सामान्य आहे. पण जर तुमचे केस दररोज यापेक्षा जास्त गळत असतील आणि तुम्ही हळूहळू टक्कल पडण्याकडे वाटचाल करत असाल तर तुम्ही सावध राहण्याची गरज आहे. कारण केस गळणे हे व्हिटॅमिनच्या कमतरतेचे तसेच काही आजाराचे लक्षण असू शकते. त्यामुळे याबाबत डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या. चला जाणून घेऊया केस गळण्यामागे कोणत्या व्हिटॅमिनची कमतरता असू शकते.**

- नारळाचे दूध : केसांच्या आरोग्याबाबत चिंतित असाल तर नारळाचे दूध तुम्हाला ही समस्या दूर करण्यात मदत करू शकते. नारळाच्या दुधाचे गुणधर्म तुमच्या केसांना अंतर्गत पोषण आणि आर्द्रता प्रदान करतात, विशेषत: थंड हवामानात, ते केसांचा कोरडेपणा कमी करण्यासाठी प्रभावीपणे कार्य करते.
- व्हिटॅमिन डी : केस गळणे किंवा टक्कल पडण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे व्हिटॅमिन डीची कमतरता. व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे केस कमकुवत होतात आणि तुटायला लागतात. यामुळे टक्कल पडण्याचा किंवा टक्कल पडण्याचा धोका असतो. केसांच्या वाढीसाठी आणि मजबुतीसाठी जीवनसत्त्वांसोबतच खनिजांचीही गरज असते. लोहाच्या कमतरतेमुळे केसांची संरचना कमकुवत होऊ शकते, केसांची वाढ मंद होऊ शकते आणि केस गळणे किंवा गळणे वाढू शकते.
- व्हिटॅमिन ए : केस गळण्यामागे व्हिटॅमिन ए ची कमतरता देखील कारणीभूत आहे. कारण व्हिटॅमिन ए केस मजबूत करण्याचे काम करते. व्हिटॅमिन ए च्या कमतरतेमुळे केस गळायला लागतात. झिंकच्या कमतरतेमुळे केस गळती आणि केस गळती होऊ शकते.
- व्हिटॅमिन ई : व्हिटॅमिन ईच्या कमतरतेमुळे स्कॅल्पमध्ये ऑक्सिडेटिव्ह तणाव निर्माण होतो, ज्यामुळे केसांचे फॉलिकल्स कमकुवत होतात आणि केस गळतात.
- व्हिटॅमिन सी : व्हिटॅमिन सी हे कोलेजन बूस्टर म्हणून पाहिले जाते. म्हणजेच व्हिटॅमिन सी शरीरात कोलेजनचे उत्पादन वाढवते. कोलेजनच्या कमतरतेमुळे केसांचे कूप कमकुवत होतात. त्यामुळे जेव्हा शरीरात व्हिटॅमिन सीची कमतरता असते तेव्हा केस गळायला लागतात.
- व्हिटॅमिन बी : व्हिटॅमिन बी ७ ला बायोटिन म्हणतात. बायोटिन केसांच्या वाढीसाठी खूप महत्वाचे आहे. हे असे समजून घ्या, बायोटिन हा केसांसाठी डोस आहे, जो त्यांना पोषण देतो. व्हिटॅमिन बी ७ च्या कमतरतेमुळे केस गळायला लागतात आणि ते पातळ, ठिसूळ आणि फुटतात. फॉलिक ॲसिड, बी ६ आणि बी १२ सारख्या इतर ब जीवनसत्त्वांच्या कमतरतेमुळे केस गळू शकतात.



## केस गळण्याची कारणं

**हवेतील वाढते प्रदूषण, बदलती जीवनशैली, सूर्यप्रकाशाचा अभाव या सर्वांचा परिणाम अनेकांच्या केसांवर होताना दिसत आहे. केस गळण्याची समस्या अनेकांना उद्भवली आहे. ही समस्या सामान्य वाटत असली तरी त्याचे परिणाम गंभीर असतात. त्यामुळे या समस्येवर वेळीच उपचार करणे गरजेचे आहे. पण केस गळण्यावर योग्य असा कोणताच उपचार नाही. अनेक महागड्या ट्रिटमेंट्स आणि महागड्या प्रोडक्ट्सचा वापर केला तरी काही काळापर्यंत त्याचा परिणाम जाणवतो. त्यामुळ नक्की काय करावे हे समजत नाही.**

खरेतर केस हे एक सौंदर्य आहे आणि आत्मविश्वास वाढवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. अनेक केमिकलयुक्त प्रोडक्टमुळं केस अधिक खराब होतात अशा परिस्थितीत आयुर्वेदाचा मार्ग निवडावा असं तज्ञ सांगतात. आम्ही तुम्हाला काही प्रभावी पद्धतींबद्दल सांगणार आहोत, ज्या टाळूची स्वच्छता आणि केस गळणे रोखण्यासाठी खूप प्रभावी ठरू शकतात. पण त्याआधी आपण केस गळण्याची कारणे जाणून घेणार आहोत, जेणेकरून तुम्हाला ही समस्या व्यवस्थित समजू शकेल.

### शारीरिक कारण

केस गळण्यामध्ये रासायनिक उत्पादनांचा समावेश होतो. परंतु या व्यतिरिक्त, इतर कारणे आहेत ज्याबद्दल जाणून घेणे आपल्यासाठी खूप महत्वाचे आहे. जसे की हिमोग्लोबिन आणि लोहाची कमतरता, कॅल्शियमची कमतरता, PCOS, हार्मोनल असंतुलन, हायपोथायरॉईडीझम आणि रजोनिवृत्ती ही सर्व केस गळण्याची शारीरिक कारणं आहेत.

### मानसिक कारण

केस गळण्याची बाह्य कारणांसोबतच काही मानसिक कारणेही आहेत. उदाहरणार्थ, जर तुम्ही जास्त ताण घेतला तर त्याचा थेट परिणाम तुमच्या केसांवर होतो, ज्यामुळे केस पांढरे होतात आणि केस गळणेदेखील वाढते. याशिवाय प्रवासात जास्त वेळ लागल्याने निराश होणे ही तुमच्यासाठी चिंतेची बाब बनू शकते आणि त्यामुळे केस गळू शकतात.

१ आवळा आणि रीठाने केस गळणे थांबवा : स्कॅल्प इन्फेक्शन हे केस गळण्याचे एक मुख्य कारण असू शकते, ज्यासाठी आयुर्वेद आवळा, शिककाई आणि रेठा वापरण्याची शिफारस करते. आपण टाळू स्वच्छ करण्यासाठी यापैकी एक किंवा तीनही पर्याय वापरल्यास केस गळती थांबवता येते. कमकुवत केस मजबूत होतात.

२ केसांना द्या पोषण : आमलकी, जास्वंदी आणि मका वापरून तयार केलेल्या तेलाने केसांना मसाज केलात तर योग्य पोषण मिळते. तुम्ही तुमचे केस आणि टाळूचे पोषण करू शकता. याशिवाय आयुर्वेदात चंद्रप्रभा वटी, आरोग्यवर्धिनी वटी आणि जटामांसी यांचा उल्लेख आहे, त्यांचा वापर खूप फायदेशीर आहे.

३ दिनचर्येत करा बदल : आपले केस गळण्याचे मुख्य कारण म्हणजे खराब आणि असंतुलित दिनचर्या, कारण जर आपल्याला पुरेशी झोप मिळाली नाही तर आपण दिवसभर चिडचिड आणि तणावाखाली राहतो, ज्याचा थेट परिणाम केसांवर होईल. त्यामुळे तुमची झोपण्याची वेळ, उठण्याची वेळ, खाण्यापिण्याच्या वेळेचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. तुमच्या दिनचर्येत योगाचाही समावेश करा.

गुड इव्हिनिंग City

फॅशन | संसार | सौंदर्य

सखी

# लग्नासाठी थीम ठरवताना...

**सध्या लग्नाचा सीझन सुरू आहे. पुढील काळात अनेकांची लग्न ठरलेली देखील असतील. आता लग्न म्हटले की, लग्नाची केवढी तयारी येते. लग्न भव्यदिव्य करणे असो वा एकदम साधे. प्रत्येक लग्नाच्या प्लॅनिंगचं टेन्शन हे सगळ्यांनाच असतं. कार्यक्रम सुरळीत पाडावा अशी इच्छा प्रत्येकालाच असते. सध्या अनेक लग्नांमध्ये थीम ठरवली जाते. ही थीम तुम्हीही तुमच्या लग्नात ठेवू शकता. थीम ठेवणं म्हणजे नेमकं काय आणि थीम कशी ठरवायची ते आता जाणून घेऊया...**



- लग्नाची थीम म्हणजे काय? : प्रत्येक नववधू आणि वराचे स्वप्न असते की, त्यांचे लग्न नेमके कसे व्हावे, त्यासाठी त्यांनी काही विचारदेखील केलेला असतो. कोणाला आपल्या लग्नात चमकधमक, काहींना अगदीच क्लासी, काहींना फिल्मी असे लग्न व्हावे असे वाटत असते. आता तुम्हाला जे वाटतंय त्याला प्रत्यक्षात उतरवण्यासाठी एक अरेंजमेंट केली जाते. त्याला थीम असे म्हणतात.
- साऊथ इंडियन थीम : सध्या तुम्ही जिथे तिथे पाहाल तिथे तुम्हाला साऊथ इंडियन साडी ड्रेप आणि ज्वेलरी अशा सगळ्या काही गोष्टींची चलती आहे. खूप जणांना साऊथ इंडियन गाणी, कपडे आणि डेकोरेशन असे सगळे काही आवडते. अशांसाठी साऊथ इंडियन थीम ठेवता येईल. ही थीम तुम्ही ठरवली की, तुम्हाला त्यामध्ये गोंड्याची फुले, केळीची पाने, काकडा, मोगरा अशी काही फुले वापरून डेकोरेशन करता येते. शिवाय जेवण मस्त केळीच्या पानात वाढता येते. साऊथ इंडियन पदार्थ आणि त्यानुसारच जर तुम्ही कपडे घातले तर त्याला अधिक न्याय मिळतो. ही एक थीम तुम्हाला ठेवता येईल.
- मराठमोळी थीम : महाराष्ट्रात मराठी पद्धतीने लग्न करणे अगदी स्वाभाविक आहे. पण आपल्या लग्नाला अस्सल मराठमोळा टच द्यायचा असेल तर तुम्हाला ही थीमही ठेवता येईल. ही थीम ठेवणे सगळ्यात जास्त सोपे आहे. असे वाटत असले तरी असे अजिबात नाही. कारण मराठमोळी थीम करताना त्याचे डेकोरेशन हे खूप बेसिक असावे लागते. यामध्ये जास्तीत जास्त फुलांचा वापर केला तर खूपच जास्त चांगले. जेवणाच्या बाबतीत म्हणाल तर हल्ली लोकांना मस्त घरगुती जेवण आवडते. मोदक, मटण, भाकरी, पालेभाजी, उसळ, मिसळ असे तुम्हाला ठेवता येते. तुम्ही लोकांना मराठमोळे कपडेदेखील घालायला काहीच हरकत नाही.
- मॉडर्न वेडिंग : नव्याची कास धरणारे तुम्ही असाल तर तुम्हाला मॉडर्न अशी थीमदेखील ठेवता येऊ शकते. यामध्ये तुम्हाला डेकोरेशनही ट्रेंडी करता येते. यामध्ये जेवण इंटरनॅशनल असे ठेवता येते. अशा लग्नातही खूप मजा येते. अशा थीमला बजेट थोडे जास्त जाते. पण ज्यांना संगीत, पुल पार्टी, हळद असे सगळे काही करायचे असेल तर तुम्ही देखील अशा पद्धतीने मॉडर्न वेडिंग करा. कोणतीही थीम ठेवताना तुम्ही त्यासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टींचा विचार करायला हवा आणि मगच थीम ठेवायला हवी.



# कशाला हवी तडजोड?

**आजकाल विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या स्त्रिया स्वत:बाबतही सजग असलेल्या पाहावयास मिळतात. आपल्या व्यक्तिमत्वाकडे लक्ष देणाऱ्या स्त्रिया सर्वांचे लक्ष वेधून घेतात. त्यांचा पेहराव, कार्यतत्परता, निर्णय क्षमता, प्रसंगावधान अशा सगळ्या गोष्टी आपोआप दृष्टिक्षेपामध्ये येतात; पण प्रत्येकीलाच या गोष्टी जमतात असे नाही. कधी कधी आपल्या निवडीबद्दलचा गोंधळ अनेक महिलांचा आत्मविश्वासच कमी करतो.**

आजची भाजी काय करावी इथपासून ते मावस भावाच्या हळदीच्या कार्यक्रमात साडी नेसू, की वन पीस घालू इथपर्यंत हा गोंधळ सुरू असतो. काही वेळा एखाद्या कार्यक्रमात एखादी विशिष्ट थीम घेऊन तशा पद्धतीने पेहराव करणे अपेक्षित असते. बरेचदा काही सौंदर्य स्पर्धांमध्ये वनपीस किंवा इव्हीनिंग गाऊन घालून यायला सांगतात. एका महिलेने अशाच एका कार्यक्रमात सहभाग घेतला होता. स्वयंपाक, गाणे, लेखन, उत्तम संभाषण कला अवगत असणारी ती सुरुवातीला खूप खूश होती. स्पर्धेच्या दिवशी मात्र तिला आयोजकांनी दिलेल्या ड्रेसमध्ये अजिबात आरामदायी जाणवत नव्हते. रोजच्या साध्या कॉटनच्या साड्यांमध्ये ती खूप प्रसन्न वाटायची. त्या इव्हीनिंग गाउनमध्ये तिचा आत्मविश्वास आपोआप कमी झाला. बरेचदा आपण इतरांच्या सल्ल्यानुसार किंवा मी घातले नाही, तर मला काकूबाई म्हणतील या अट्टहासाने आपल्याला न रुचणारे, न शोभणारे, कपडे घालतो; पण तेव्हा ते सगळ्यांच्या लक्षात येते. त्यामुळे आपली उंची, रंग, रूप, प्रकृती या सगळ्याचा अंदाज बांधून आपण काय परिधान केल्यानंतर आरामदायी असतो, याचा विचार करून कपडे निवडायला हवेत.

## ज्वेलरीबाबतीत...

ज्वेलरीबाबतीतही असेच असते. बरेचदा कुठल्या ड्रेसवर काय घालावे याचाही गोंधळ उडतो. तेव्हा आपण आपल्या चेहऱ्याला, ड्रेसला अनुसरून योग्य त्या दागदागिन्यांची निवड केली पाहिजे. प्रत्येक पोषाखावर शोभून दिसणारे विविध प्रकारचे फॅशनेबल कानातले बाजारात उपलब्ध असतात. बऱ्याचदा चेहरा छोटा, मोठा किंवा उभा, गोलाकारात असल्याने जे एकीला छान दिसते ते दुसरीला दिसेलच असे नाही; पण केवळ आता बाजारात याची फॅशन आहे म्हणून घालणे हे बऱ्याचदा आपले हसू करून घेण्यास कारणीभूत ठरते.

## चप्पल, बूट, सँडल

अगदी चप्पल, बूट, हाय हिल सँडल यातही असाच गोंधळ उडतो. बरेचदा खूप लांबवरचे अंतर पायी जायचे असेल, तर अशा वेळी उंच टाचेच्या चपला किंवा बूट वापरू नयेत. त्यामुळे पाय जास्त दुखतात. आज काल मॉडर्न होण्याच्या नादात बरेचसे कपडे उगाचच खरेदी केले जातात आणि आरामदायी नसूनही परिधान केले जातात. त्याचा परिणाम म्हणून आत्मविश्वास डळमळीत होऊ शकतो. तेव्हा फक्त फॅशन आहे म्हणून, मैत्रीण सांगते म्हणून किंवा स्टेटसच्या नावाखाली आपल्याला आराम न देणारे कपडे, दागिने, केशभूषा यात तडजोड न केलेली बरी.



## काहींना कोणतेही कपडे दिसतात छान

काही जणी मुळातच दिसायला इतक्या सुंदर असतात, की त्यांना साधेसे कपडेही छान दिसतात. खूप फाउंडेशन, डोळ्यांचा मेकअप, केशभूषा, अति भडक लिपस्टिक याने बऱ्याचदा हसू होऊ शकतं. तेव्हा आपण ज्या कार्यक्रमाला जात आहोत, तिथे कुठल्या वयोगटाचे लोक जमणार आहेत, कामाचे किंवा इतरही काही उपक्रम असतील, तर त्याचे स्वरूप काय आहे, याचा अंदाज घेऊनच कपड्यांची निवड करावी. ट्रेकिंगला जाताना सुती, घाम शोषणारे, थोडे सैलसर कपडे आणि शूज वापरायला हवेत. थोडा वेळ खर्च करून आपण वेगवेगळ्या कार्यक्रमासाठी लागणारे कपडे, दागिन्यांची सोय आधीच केली, तर वेळेवर गोंधळ होत नाही. आपण आपल्या कम्फर्टेबल म्हणजे आरामदायी वाटणाऱ्या कपड्यातच जास्त प्रसन्न असतो. त्यामुळे इतर कोणताही कम्फर्ट झोन टाळलात, तरी कपड्यांचा कम्फर्ट झोन मात्र टाळू नका.

## लाल लिपस्टिक नवरीने वापरण्यापूर्वी...

- लाल लिपस्टिकमध्ये अनेक शेड असतात. त्यामुळे बाजारातून तुमच्या लग्नासाठी खास लिपस्टिक खरेदी करताना तुमच्या स्कीन टोननुसार शेड निवडा.
- लाल लिपस्टिकमध्ये बोल्ड शेड अथवा लिप कलर वापरताना लिप लायनरचा वापर करा.
- लाल लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांना लिप बाम जरूर लावा. कारण त्यामुळे तुमचे ओठ मऊ राहतील आणि लिपस्टिक जास्त काळ टिकेल.
- रेड लिपस्टिकने बोल्ड लुक करताना लिपस्टिक नेहमी लिप ब्रशनेच ओठांवर लावा.
- लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांना कन्सिलर अथवा फाउंडेशन लावल्यामुळे तुमचा लुक क्लीन आणि नीट नेटका दिसतो.

## काय करू नये...

- लाल लिपस्टिक लावल्यावर त्यावर लिप ग्लॉस लावणं टाळा. कारण लिप ग्लॉस पसरला तर तुमचा लुक खराब होऊ शकतो.
- लाल लिपस्टिक लावून बोल्ड दिसायचं असेल तर ओठां व्यतिरिक्त इतर भागावर बोल्ड मेकअप ट्राय करून हायलाइट करू नका.
- लाल लिपस्टिक लावण्यापूर्वी ओठांची निगा राखण्यासाठी ओठ स्वच्छ करा. कारण फुटलेल्या ओठांवर लाल लिपस्टिक चांगली दिसत नाही.
- लाल लिपस्टिक लावण्यापूर्वी तुम्ही ओठांवर फाउंडेशन लावू शकता मात्र फाउंडेशनची शेड जास्त लाइट असता कामा नये, नाहीतर तुमच्या लिपस्टिकचा शेड बदलतो.
- ओठांवर लाल लिपस्टिक लावताना लिप लायनर जास्त उठून दिसेल असं लावू नका, नाहीतर तुमच्या ओठांचा शेप कृत्रिम वाटू लागेल.



# गुड इव्हिनिंग City

१६ जानेवारी २०२५, गुरूवार



आधी सगळीकडे भाव पहा मगच आमच्याकडे या आमच्या रेट मध्ये जॉब मिळूच शकत नाही

स्वप्नील एकनाथराव घोरपडे (सातगावकर) 7350505235

होलसेल

डिजिटल बॅनर प्रिंटिंग युनिट

सर्व प्रकारचे डिजिटल बॅनर डिझाईनिंग व प्रिंटिंग करून मिळेल

DSD मॉल दु नं 131 बुलढाणा


### लग्न, वाढदिवस, वास्तुशांती, मुंज निमंत्रणासाठी सोशल मीडियाचा वापर

# डिजिटलायझेशनने छापील पत्रिकांची मागणी घटली

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : दिवाळीनंतर सर्वत्र लग्नसराईचे दिवस सुरु आहेत. सध्या नोकरी, व्यवसाय व छोटे कुटुंब यामुळे धावपळीच्या युगात प्रत्येकाला लग्नपत्रिका देणे शक्य होइनासे झाले आहे. त्यामुळे ई-वेडिंग कार्डचा वापर करून विविध सोशल मीडिया प्लॅटफार्मवर स्नेहीजनांना आमंत्रण देण्यावरच अनेकांचा भर असल्याचे दिसून येत आहे. सध्या सोशल मीडियाद्वारे नातेवाईक, स्नेहींना लग्नपत्रिका, वास्तुशांती, वाढदिवस, डोहाळे जेवण अशा कार्यक्रमाची पत्रिका पाठविण्याचा ट्रेंड आहे. वेळेच्या आभावामुळे हा ट्रेंड वाढत चालला आहे. असे डिजिटल कार्ड तयार करुन देणाऱ्या लहान मोठ्या कंपन्या आहेत. व्यावसायिक आहेत. त्यांच्याकडून हव्या तशा डिझाईनचे डिजिटल आमंत्रण पत्रिका तयार घेता येतात. शिवाय काही ॲपद्वारेही घर बसल्याही अशा आमंत्रण पत्रिका तयार करता येतात.




## पत्रिका वाटण्याची परंपरा गावापुरती मर्यादित

**लग्नपत्रिका आवश्यक तितक्या छापून घेतल्या जातात. त्यानंतर पाहुणे, मित्रमंडळी यांची नावे व गंध अक्षता लावून रितीरिवाजानुसार अत्यंत जवळच्या नातेवाईकांना निमंत्रण प्रत्यक्ष त्यांच्या घरी जावून दिली जातात. अद्यापही पत्रिका घरीघरी जावून पत्रिका वाटण्याची परंपरा जपली जाते.**

### डिजिटल पत्रिकांमध्येही प्रकार

आता डिझायनरकडून डिजिटल आमत्रंण पत्रिका तयार करुन त्या सोशल मीडियाद्वारे पाठविण्याला प्राधान्य दिले जाते. त्यातही आता नव नवीन प्रकार आले आहेत. ज्यात जीआयएफ पत्रिका, व्हिडीओ स्वरुपातील पत्रिका, इल्युटेशनद्वारे तयार केलेल्या पत्रिका हटके दिसतात.

### प्रिंटींग व्यवसायावर परिणाम

पुर्वी सामान्य व्यक्ती पाचशे, एक हजार लग्नपत्रिका छापत होते, तर श्रीमंत व्यक्ती आपल्या प्रतिष्ठेला शोभेल, साजेल अशा आकर्षक आणि महागड्या लग्नपत्रिका छापून घेत. आता नावापुरत्या पत्रिका काढल्या जात आहेत. गरजेनुसार वा कार्यक्रमाच्या आवाक्यानुसार आता वाटतील तशा डिजिटल पत्रिका बनविण्यात येतात.

# साहेब, गरीबांच्या घरांसाठी अनुदानाच्या रक्कमेत वाढ करा

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : घरकुल योजनेच्या माध्यमातून गोरगरिबांच्या घराचे स्वप्न साकारले जात आहे. मात्र, या योजनेतून मिळत असलेल्या अत्यल्प मानधनामुळे लाभार्थ्यांची प्रचंड दमछाक होत आहे. एकीकडे सिंचन विहिरीकरिता ५ लाख रुपये, सभागृहाकरिता ८ लाख रुपयांचा निधी असेल तर घरकुलासाठी केवळ १.२० लाख निधी का? असा प्रश्न लाभार्थ्यांतून उपस्थित केला जात आहे.



शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना, यशवंतराव घरकुल योजना, रमाई आवास, मोदी आवास अशा विविध योजनांच्या माध्यमातून घरकुल योजना राबविण्यात येतात. गोरगरिबांच्या घराचे स्वप्न घरकुल योजनेच्या माध्यमातून साकारण्यात येत असले, तरी सद्यस्थितीत घरांचे बांधकाम साहित्य प्रचंड महागले आहे. त्यातच मजुरीचे दर गगनाला भिडले आहेत. त्यामुळे आयुष्यभराची जमापुंजी गोरगरिबांकडून घरकुलासाठी वापरली जाते. वेळप्रसंगी नातेवाईकांकडून उसनवारी केली जाते. एकंदरीत सव्वा लाखाचे घरकुल अडीच ते तीन लाखांच्या वर जात असल्याची वास्तविक स्थिती आहे. शासनाकडून गावात एखादे सभागृह बांधायचे असल्यास जवळपास ८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला जातो. सिंचन विहिरीकरिता ५ लाखाचे अर्थसहाय्य दिले जाते. शहरी भागात घरकुलासाठी अडीच लाख रुपये मिळतात. मग ग्रामीण भागातील लाभार्थी सव्वा लाखात घरकुल कसे बांधणार? घर बांधण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे दर वाढले आहेत. मात्र, शासनाने ग्रामीण व शहरी भागातील घरकुल निधीतील तफावत व निधी कपातीचा घेतलेला निर्णय घरकुल लाभार्थ्याला कर्जबाजारी बनवणारा ठरत असल्याचा आरोप लाभार्थीमधून होत आहे.






# लद्धड महाविद्यालयामध्ये करियर मार्गदर्शन चर्चासत्र कार्यक्रम



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : व्हिजन बुलढाणा एजुकेशनल अँड वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित लद्धड औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयामध्ये येळगाव, बुलढाणा येथे १४ जानेवारी रोजी महाराष्ट्र स्टेट फार्मसी कॉन्सिलस ड्रा इन्फर्मेशन सेंटर च्या वतीने आज 'जागतिक शैक्षणिक संधी आणि आंतरराष्ट्रीय फेलोशिप' या महत्त्वपूर्ण विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्हि. एन. श्रीखंडे यांची उपस्थिती लाभली. या सेमिनारचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून अमितकुमार माने (फाउंडर अँड सीईओ, ग्लोबल फार्म क्याडमी, पुणे) यांची उपस्थित लाभली. विद्यार्थ्यांना जागतिक शिक्षणाच्या संधी व आंतरराष्ट्रीय फेलोशिपच्या महत्वाची सखोल माहिती दिली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षण घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधी, शिष्यवृत्ती व फेलोशिप कार्यक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच त्यांनी आपल्या भाषणात आंतरराष्ट्रीय शैक्षणिक अनुभव, त्यातून मिळणारे फायदे व भविष्यातील करिअरच्या दृष्टीने फार्मसीचे महत्व यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व या विषयावरील तज्ज्ञ मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी, उपस्थित विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देत, अमितकुमार माने यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन डॉ. एच. जे. धोंगडे यांनी केले.

# महाराष्ट्र राज्य राजभवनाच्या परेडसाठी जान्हवी गाढेची निवड

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : स्थानिक द्वारका ग्रामीण विकास संस्थेद्वारा संचालित राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी बुलढाणाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाचे रासेयो स्वयंसेवक दर वर्षी राज्य पातळीवर तसेच देश पातळीवर विद्यापिठाचे तसेच महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत असतात.

या वर्षी राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसीची राष्ट्रीय सेवा योजनेच्या कु. जान्हवी विष्णु भगवान गाढे यांचे महाराष्ट्र राज्य राजभवनाच्या गणतंत्र दिवसाच्या परेड साठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवड झाली आहे. हा बहुमान प्राप्त करून देणारी ही महाविद्यालयाची पहिली विद्यार्थिनी असून तिच्या मेहनतीने तसेच चिकाटीने केलेल्या कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे संस्था अध्यक्ष धृपदराव सावळे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष जैन यांनी तिचे कौतुक केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठचे राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ.निलेश कडू सर यांनी सुद्धा दूरध्वनी द्वारे कु.जान्हवी गाढे तसेच महाविद्यालयाचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी रोहित सालकुटे यांचे कौतूक केले. राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी गत काही वर्षात राष्ट्रीय एकता शिबिर, राज्य स्तरीय आव्हान कॅम्प, राज्यस्तरीय प्रेरणा शिबिर, राज्यस्तरीय उत्कर्ष शिबिर तसेच राज्यस्तरीय डव्हेंचर कॅम्पमध्ये महाविद्यालयाचे तसेच विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून अनेक बहुमान पटकावले आहे. असे बहुमान पटकवणारे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी हे सर्व फार्मसी महाविद्यालय विद्यापीठात अग्रस्थानी आहे.





आम्ही १९८० पासुन अखंड, अविरत आपल्या सेवेत आहोत; आता आम्ही आलो आहोत

सिटी स्नैक्स & आईसक्रीम

या नव्या रूपात

पता : सर्कुलर रोड, टाटा मोटर्स (शोरूम) समोर, बुलढाणा.

संपर्क : सुरेश जादम : ९४२१४६४१३१


# म्हाडा कॉलनीत एक लाख रुपयांची चोरी

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहरात सध्या चोरीचे प्रमाण वाढले असून, म्हाडा कॉलनीत राहणाऱ्या एका प्रसारमाध्यमाच्या प्रतिनिधीच्या घरातून चोरट्यांनी जवळपास एक लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना १५ जानेवारी रोजी उघडकीस आली. दृकश्राव्य माध्यमामध्ये काम करणारे संदीप वानखडे हे १२ जानेवारी रोजी बाहेरगावी गेले होते. बुधवारी ते परत आले असता, त्यांना घराचे कुलूप तुटल्याचे दिसून आले. घरातील साहित्य व आलमारीतील वस्तूही ही अस्ताव्यस्त होत्या. चोरट्यांनी ९ ग्रॅम सोन्याची पोत आणि नगदी ३५ हजार रुपये असा जवळपास एक लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. चोरट्यांनी घरात फ्रिजमध्ये ठेवलेल्या दूध व मलाईवरही हात मारला. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पहाणी केली. ठसे तज्ज्ञांनी ठसे घेत पंचनामा केला.

# जवाहर नवोदय विद्यालय; १८ जानेवारीला निवड चाचणी परीक्षा

**बुलडाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता सहावीच्या २०२५ च्या शैक्षणिक प्रवेशासाठी निवड चाचणी परीक्षा १८ जानेवारी २०२५ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील ४० परीक्षा केन्द्रावर होणार आहे. या परिक्षेत जिल्ह्यातून १२ हजार ०७३ विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

जिल्ह्यातील केद्रांवरील परीक्षा सुरळीत, निपक्षपणे पार पाडण्यासाठी तसेच हुशार व गुणवंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कष्टाचे फळ मिळावे यासाठी परिक्षा दरम्यान कोणताही अनुचीत प्रकार होणार नाही, यांची दक्षता घेतली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाकडुन विशेष भरारी पथक व बैठे पथकांची नियुक्ती केली जाणार असुन सदर पथके विविध केंद्रावर भेटी देणार आहेत. परीक्षा केंन्द्रावर विद्यार्थी किंवा इतर कोणाकडुनही गैरप्रकार करतांना आढळल्यास संबधितांवर नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात येईल, यांची नोंद संबंधीताने घ्यावी. निवड चाचणी परिक्षा शांततेत व सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले.

## परीक्षेसाठी भरारी पथकांची नियुक्ती

# बाजारात येण्यापूर्वीच कोसळले तुरीचे भाव !

## महिनाभरापूर्वी १० हजार रु. प्रतिक्विंटल; आता ७ हजारांनी होतेय खरेदीः बळीराजा व्यथित



**बुलढाणा, १५ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : यावर्षी शेतकऱ्यांना सोयाबीनचे भाव कमी मिळाले आहे, तीच परिस्थिती कापस-ाची सुध्दा आहे. किमान तुरीला समाधानकारक भाव मिळेल अशी शेतकऱ्यांना अपेक्षा होती, कारण मागील दोन ते तीन वर्षांपासून तुरीला प्रतिक्विंटल दहा हजारांच्या आसपास भाव मिळाला होता. मात्र यंदा शेतकऱ्यांची तूर बाजारात विक्रीसाठी येणार तोच तुरीचे दर मागील महिनाभरात तब्बल क्विंटल मागे तीन हजारांनी घसरले आहे. त्यामुळे आता शेती कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. महिनाभरापूर्वी स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत तुरीला प्रतिविंटल पावणे दहा ते दहा हजार रुपये भाव होते. किमान तेच भाव तुरीला कायम राहतील आणि सोयाबीन तसेच कपाशीमध्ये झालेले नुकसान काही प्रमाणात भरून निघेल, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा होती मात्र या अपेक्षांचा सुध्दा भंग झाला आहे. तुरीचे भाव कमी होण्याची काही तूर व्यावसायिकांनी कारणे सांगितले कि, नविन तूर अल्प प्रमाणात बाजारात येत आहे, त्यामध्ये आद्रतेचे प्रमाण जास्त आहे. तसेच आगामी महिनाभरात विवाहाचे मुहूर्त नाही, त्यामुळे दालमिलकडून तूरीची खरेदी थांबल्यास-ारखीच आहे. तसेच काही प्रमाणात तूर आयातसुध्दा केली जाते. या कारणांमुळे तुरीचे दर कमी झाले आहे. सोयाबिन, कापूस आणि आता तूर हे खरीपाचे मुख्य पिक आहेत. एकापाठोपाठ एक तिन्ही पिकांना मातीमोल भाव मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना जबर आर्थिक धक्का बसला आहे. एकीकडे महागाई वाढली आहे, शेतीच्या मशागत खर्चात वाढ झाली आहे, शेत मजूरांच्या मजूरी खर्चात वाढ झाली आहे. असे असताना शेतीमालाचे दर वाढण्याऐवजी तीन, चार वर्षांपूर्वी जे भाव मिळत होते, ते भाव आज शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अर्थचक्र कसे चालवायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाकडून शेतकऱ्यांच्या कृषी मालाला भाव देण्यासंदर्भात केवळ तोंडाला पानं पुसण्याचे धोरण असल्याचे शेतकरी आरोप करतात. कारण शासकिय खरेदी केन्द्रावर शेतकरी माल विक्रीसाठी गेल्यानंतर येणारे अनुभव, त्यासाठी असलेली किचकट व वेळखाऊ प्रक्रिया मनस्ताप देणारी असल्याचा अनुभव शेतकरी सांगतात. त्यावरून केवळ शासन जबाबदारी झटकण्याचे काम करत असल्याचेही शेतकरी म्हणतात.

# शिव जयंती उत्सव समितीची उद्या बैठक



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्रासाठी पथदर्शक आणि दिशादर्शक ठरलेल्या छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांच्यावतीने येत्या १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वजनिक शिवजयंती सोहळ्यासाठी तातडीची बैठक शनिवार १८ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा याठिकाणी आयोजित करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बुलढाणा यांनी सन २०१६ पासून सार्वजनिक शिवजयंती सोहळ्याची मुहूर्तमेढ रोवली.. पुढे हीच परंपरा महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सुरू झाली. त्यामुळे बुलढाणा सार्वजनिक शिवजयंती सोहळा समितीचे महत्त्व विशेष आहे. सन २०२४ मध्ये सार्वजनिक समितीचे अध्यक्षपद आ. संजय गायकवाड यांनी भूषविले होते. आता १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती जयंतीची लगबग सुरू झाली असून, त्याच अनुषंगाने पुढील अध्यक्ष निवडण्यासाठी व मागील हिशोब सादर करण्यासाठी परवा शनिवार १८ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे शहरातील तमाम शिवप्रेमीची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती अध्यक्ष आ. संजय गायकवाड व सचिव प्रा. सुनील सपकाळ यांनी दिली आहे. या बैठकीसाठी शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सार्वजनिक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# युवकांनी वाचनाकडे वळावे : प्राचार्य डॉ.सुरेश बाठे



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : कला महाविद्यालय, बुलडाणा येथे ८ जानेवारी रोजी ग्रंथालयात वाचन संकल्प पंधरवाडा संपन्न झाला. सर्वप्रथम डॉ. आर. रंगनाथन कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते असे म्हणाले की, तरुण पिढीला ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करून वाचन संस्कृती जोपासण्यासाठी वाचनालय हे प्रमुख माध्यम आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचन कक्षात बसून वाचन केले पाहिजे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. बाठे यांनी ग्रंथालयात वाचन पंधरवाडा दिनानिमित्त केले. कार्यक्रम अध्यक्षस्थानी शरद शिक्षण व युवक कल्याण संस्था चिखली व्दारा संचालित, कला महाविद्यालय, बुलडाणा संस्थेचे सचिव डॉ.अजिंक्य पाटील हे होत. या कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# भगवानसिंह राजपूत यांना निवृत्त सेवा पुरस्कार देऊन सन्मानित



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन पुणे तर्फे पेन्शनर्स डे चे औचित्य साधून, रविवार, ५ जानेवारी रोजी बारामती जिल्हा पुणे येथे पद्मश्री अण्णासाहेब पवार सभागृह संघटनेचे अध्यक्ष एन. डी. मारणे कार्याध्यक्ष वसंतराव वाबळे, सरचिटणीस लक्ष्मणराव टेंबे यांच्या शुभ हस्त भगवानसिंह डोंगरसिंह राजपूत यांना निवृत्त सेवा पुरस्काराने गौरवण्यात आले. भगवानसिंह राजपूत यांनी बुलढाणा या संघटनेमध्ये संचालक आणि सचिव पदावर राहून महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून सन २०११ मध्ये निवृत्ती नंतर ही आपला अमूल्य वेळ देऊन सेवा स्वरुपाने निवृत्त संघटनेच्या कामासाठी वेळ देऊन आयुष्याचा उत्तरार्धाचा आलेख आदर्श आणि चमकदार ठेवताना अन्य सेवानिवृत्तांना प्रेरित करुन संघटनेस सभासद मिळवून देण्यासह संघटन मजबुतीचे कार्य सर्वार्थाने करत शिखर संघटनेचे निवृत्त सेवा समाचार अंकाचे जास्तीस जास्त आजीव सभासद वर्गणीदार करुन महाराष्ट्र पेन्शनर्स असोशियनला आर्थिक बळ देण्याचे कार्य त्यांनी केले. अन्य समाज सेवेच्या कार्याची धुरा यशस्वी पणे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ.मधुकरराव पऱ्हाड यांच्या मार्गदर्शना खाली तसेच पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने पेलत असल्याबाबत आपल्या कार्याची प्रशंसा करत पेन्शनर दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र पेन्शनर असोसिएशन पुणे संस्थे तर्फे त्यांचा मानपत्र व सन्मान चिन्ह देऊन जाहीर सत्कार करुन गौरवण्यात आले आहे. जाहीर सत्कार सोहळ्यात राज्यभरातून जीवन गौरव पुरस्कारार्थी तसेच निवृत्त सेवा पुरस्कारार्थी कुटुंबासह मोठ्या संख्येने हजर राहून पुरस्कार सोहळा मोठ्या प्रमाणावर आनंदाने पार पाडून संपन्न करण्यात आला. जिल्हा संघटनेने या अगोदर त्यांना सन्मान पत्र देवून गौरविले आहे.

# सातव्या नॅशनल लेव्हल अबॅकस परीक्षेमध्ये सात विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : बुलढाण्याच्या अबॅकस च्या दोन विद्यार्थ्यांनी सारखे गुण मिळवून महाराष्ट्रातुन प्रथम क्रमांक मिळविला त्यामध्य मध्ये शिवराज नंदकिशोर तायडे याने महाराष्ट्रातून प्रथम क्रमांक मिळविला, सारंग निलेश आमले महाराष्ट्रातून प्रथम, पार्थ मोहन साळवे यांनी महाराष्ट्रातून दुसरा क्रमांक पटकावला, सतीश संतोष जोरवार याने महाराष्ट्रातून तृतीय क्रमांक पटकावला, बेस्ट स्टुडन्ट ऑफ द इयर चा मानकरी आरव महेश पवार राहिला, द्वितीय क्रमांक रितेश संतोष जोरवर याने पटकावला, आरोव महेश पवार याने महाराष्ट्रातून तृतीय क्रमांक मिळविला, या घवघवीत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचं सर्व मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी देऊन त्यांना गौरविण्यात आलं.

# दुचाकीस धडक, एक गंभीर

**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : भरधाव अज्ञात वाहनाने दुचाकीस धडक दिल्याने दोन जण गंभीर रित्या जखमी झाल्याची घटना बुलढाणा-दे-उळघाट रस्त्यावर दि १३ जानेवारी रोजी घडली. सुनील अनिल जागृत हे देऊळघाटला दुचाकी क्रमांक (एमएच २८ बीडी ००९०) ने जात होते. अज्ञात वाहनाने दुचाकीने जोरदार थड़क दिली. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. वाहन चालकावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# एकलारा, बनोडा शाळेला सौर यंत्रणा भेट




**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : ग्रामीण शिक्षणाचे भवितव्य उजळविण्यासाठी एकलारा, बनोडा येथील श्रीसंत कोटेश्वर महाराज विद्यालयाला अत्याधुनिक सौरऊर्जा यंत्रणा भेट वारी एनर्जीज लि. तर्फे देण्यात आली आहे .हा उपक्रम पर्यावरणासह शैक्षणिक क्षेत्राशी मेळ घालण्याच्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे.या यंत्रणेमुळे गावातील शाळेला अखंड वीजपुरवठा होणार असून, ही निव्वळ एक अद्ययावत पायाभूत सुविधा नाही, तर ग्रामीण भारतासाठी शाश्वत विकासाची आशा आहे. या यंत्रणेमुळे विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना तुटक वीजपुरवठ्याला तोंड न देता, शिक्षण घेता येणार असून, यामुळे दुर्गम भागात शैक्षणिक सुविधांचे नवे मापदंड प्रस्थापित होणार आहेत. या सौरऊर्जा यंत्रणेमुळे शाळेचा विजेवर होणारा खर्च मोठ्या प्रमाणावर कमी होणार असून, तो निधी इतर शैक्षणिक उपक्रमांसाठी वापरता येईल व विद्यार्थ्यांना अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देता येईल.या उपक्रमातून वारीची शाश्वत समाज तयार करण्याची आणि दरम्यान भारताच्या ऊर्जा स्थित्यंतराच्या गरजा पूर्ण करण्याची बांधिलकी दिसून आली आहे.

# वळतीत दोन गटांत राडा; नऊ जणांवर गुन्हे दाखल !

**चिखली, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील वळती येथे किरकोळ कारणावरून दोन गटांत मोठा राडा झाल्याची घटना १४ जानेव-ारीच्या रात्री ८ वाजताच्या सुमारास घडली. हा राडा वैयक्तिक भांडणावरून झाला. त्यामुळे काही काळ येथे तणाव निर्माण झाला होता. याप्रकरणी नऊ जणांविरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत.

वळती येथील प्रशांत धनवे यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, प्रशांत धनवे यांच्या दूध संकलन केंद्रात गोपाल धनवे दूध घेऊन आला होता. दूध देऊन दुचाकीने परतणाऱ्या गोपाल धनवे यास गावातील नादर खाँ गुलशर खाँ (५०) तेथे आला दुचाकीचा लाईट तोंडावर का मारला, असे म्हणून मारहाण केली. भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या प्रशांत धनवे यांनाही मारहाण केली. नादर खाँच्या साथीदारांनीही लोखंडी फायटरने मारहाण करून जखमी केले. जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यावरून पोलिसांनी नादर खाँ गुलशर खाँ, अलतमश खाँ साबेर खाँ, राहील रईस पटेल, सिराज मस्तान पटेल, इब्रान मस्तान पटेल, शोराब मस्तान पटेल, आसिफ अजीम पटेल, अजीम हनीफ पटेल या नऊ जणांना ताब्यात घेतले आहे.

# डॉ.राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास आरंभ



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** :डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला सलग्नित व इंदिरा बहुउद्देशीय शिक्षण संस्थेद्वारा संचलित डॉ.राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालय बुलढाणा येथील राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष निवासी शिबिराचे उद्घाटन सव या गावी १३ जानेवारी २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सव/अंत्री येथील सरपंच इंदुबाई विलासराव शेळके यांनी यावेळी उपस्थिती दर्शविली तसेच अध्यक्षस्थानी डॉ.राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश वाघ यावेळी उपस्थित होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वामी विवेकानंद विद्यालय, सव येथील मुख्याध्यापक मा.श्री. पुरुषोत्तम पडोळ सर तसेच विलासराव शेळके, गजानन लोखंडे, काकडे सर व शिवाजीराव लोखंडे हे विद्यार्थ्यांना प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले. यानंतर डॉ.आर.यु.वाघ व प्रमुख पाहुणे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन समारंभ कार्यक्रम पार पडला, त्यावेळी सर्व मान्यवरांनी दीपप्रज्वलन करून प्रतिमांना हार अर्पण करत अभिवादन केले व कार्यक्रमाला सुरवात केली. यावेळी नागेश राऊत व रीना राठोड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना विद्यार्थ्यांपुढे मांडली व विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक पडोळ सर यांनी विद्यार्थ्यांना श्रमसंस्कार व शिबिराबद्दल मार्गदर्शन केले. त्यानंतर शिवाजीराव लोखंडे यांनी त्यांच्या शालेय जीवनातील प्रसंग विद्यार्थ्यांसमोर मांडले आणि विद्यार्थ्यांना प्रेरित केले आणि अंतिम टप्प्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लाभलेले मा. डॉ. आर.यु.वाघ यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पटवून सांगितले व अध्यक्षीय भाषनातून विद्यार्थ्यांना शिबिराकरिता प्रोत्साहीत केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यश कायंदे व शिवम तारापुरे तर आभार प्रदर्शन मंगेश सुसर यांनी केले. सदर कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी विवेकानंद विद्यालयाचे विद्यार्थी, शिक्षकवृंद, डॉ.राजेंद्र गोडे कृषी महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न



**बुलढाणा, १६ जानेवारी (गुड इव्हिनिंग सिटी)** : जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा राहेरा, केंद्र रोहिणखेड येथे केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या यावेळी रोहिणखेड केंद्राचे केंद्रप्रमुख विनोद उचाडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सदर क्रीडा स्पर्धा पार पडल्या. यावेळी कार्यक्रमाचे उद्धाटक म्हणून गावातील अवचितराव गोराडे माजी सैनिक हे उपस्थित होते. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये राहेरा गावचे पोलीस पाटील देविदास जाधव तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संतोष जाधव उपस्थित होते. तांडा शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष अविनाश चव्हाण तसेच विकास चव्हान तसेच गावातील पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, १००-४ रिले, कबड्डी, खो-खो अशा विविध स्पर्धा प्राथमिक गट मुले मुली आणि उच्च प्राथमिक गट मुले मुली या दोन गटात पार पडल्या. पात्र विद्यार्थ्यांची निवड केंद्रावरून तालुका स्तरावर करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश कापुरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश शिंदे यांनी केले.तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केंद्राचे केंद्रप्रमुख विनोद उचाडे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संदेश कुऱ्हाडे यांनी केले यावेळी सदर कार्यक्रम तसेच क्रीडा स्पर्धा यशस्वी होण्यासाठी राहेरा शाळेचे मुख्याध्यापक सुरेश डोईफोडे, शिक्षक निलेश शिंदे, दीपक येरमुले, देशमुख मॅडम, उचाडे मॅडम, पाटकर मॅडम, पडोळ मॅडम, फिरोज सर, तसेच खेडेकर सर, अजय आढाव, गारवे सर, सरकटे सर, सुनील गवई, भोंडे सर यांनी अथक परिश्रम घेतले. सदर स्पर्धेस पंच म्हणून निलेश शिंदे, दिनकर डाबेराव, दिनेश कापुरे, संदेश कुराडे, सुनील गवई यांनी काम पाहिले. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणामध्ये या क्रीडा स्पर्धा पार पडल्या. कार्यक्रमाची सांगता बक्षीस वितरनाने झाली. यावेळी बक्षीस वितरणासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या माजी अध्यक्ष उज्वलाताई हाडे तसेच केंद्रप्रमुख विनोद उचाडे तसेच केंद्रातील सर्व शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक व पालक वर्ग उपस्थित होते.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : ॲड.हरीदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689